**मानवी हक्क आयोगाचे संदर्भाबाबत करावयाचे कार्यवाही संदर्भात शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या प्रशासकीय आदेशाचे एकत्रिकरण करुन अद्ययावत आदेश पारित करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन.
## गृह विभाग.

परिपत्रक
शासन:- क्र.संकीर्ण १३९९/संकीर्ण/पोल १४
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२, दिनांक:-१५ फेब्रुवारी २०००.

वाचा:- (१) शा.प.गृ.वि.क्र.एचआरसी १०९५/४१/पोल १४/दि.१७ जानेवारी १९९६
(२) शा.प.गृ वि.क्र.एचआरसी ०६९७/९०/१९९७/पोल १४,दि.१४ जुलै १९९७
(३) शा.प.ग.वि.क्र.एचआरसी१०९७/१७४/पोल १४,दि.९ नोव्हे.१९९७
(४) शा.प.गृ.वि.एचआरसी१३९८/२/पोल १४,दि.१ जून १९९८
(५) शा.प.गृ.वि.क्र.सीआयआय०१८७/फेब्रु.८१/पोल १४,दि. ९ जून १९९८
(६) शा.नि..गृ.वि.क्र.एचआरसी ०९९५/३४/पोल १४,दि.१८ जाने.१९९९
(७) शा.प.गृ.वि.क्र.एचआरसी १३९९/९/पोल १४,दि. ८ जून १९९९

**परिपत्रक:-** पोलीस कोठडीत तसेच न्यायालयीन कोठडीत मृत्यू पावणा-या व्यक्तीचे अहवाल पाठविण्या संदर्भात कोणती कार्यवाही करावी तसेच इतर संदर्भावर कशा त-हेने कार्यवाही करावी याबाबत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने वेळोवेळी राज्य शासनास संदर्भ केले आहेत. उपरोक्त संदर्भ लक्षात घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत शासनाने वेळोवेळी प्रशासकीय आदेश पारीत केले आहेत. उपरोक्त प्रशासकीय आदेशाचे एकत्रिकरण करुन एकच आदेश पारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने आता वरील सर्व परिपत्रके /आदेश यांचे एकत्रिकरण करुन व पूर्वीचे सर्व परिपत्रके / आदेश अधिक्रमीत करुन एकत्रितरित्या पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
. / APR 2000
शाखा उपविभाग
प्र.लि. नि. उ. जि.

(१) **पोलीस तसेच न्यायालयीन कोठडीत मृत्यू पावलेल्या आरोपीची माहिती राष्ट्रीय मानवी हक्क आयोगास कळविणे.**

जगात सर्वत्र मानवी हक्क जोपासण्याबाबत प्राधान्य देण्यात येत आहे. भारतीय राज्य घटनेत सुध्दा नागरिकांचा हक्क कसा सुरक्षित राहील हा दृष्टीकोन समोर ठेवण्यात आला आहे. देशात मानवी हक्क अधिनियम १९९३ मधील तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली असून त्या आयोगाचे सांविधानिक कार्यही सुरु झाले आहे. त्या अनुषगाने शासन परिपत्रक गृह



क्रमांक-उपशाखा/पोल/2/92८
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
रत्नागिरी दि- १०/2000
प्रत- उपविभागीय दंडाधिकारी रत्नागिरी/दापोली/चिपळूण
यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी
जिल्हादंडाधिकारी रत्नागिरी

विभाग क्रमांक : एचआरसी१९९४/जीआय २७३/सीआर ३/वि.शा-१ ब दिनांक १५ मार्च १९९५ अन्वये कोठडीतील मृत्यूच्या संदर्भातील घटने बाबतचा अहवाल २४ तासाच्या आत आयोगास पाठविण्यास कळविण्यात आले आहे. तथापि असे अहवाल वेळेवर पाठविले जात नसल्याबाबत आयोगाने तक्रार केल्याने शासन परिपत्रक गृह विभाग क्रमांक :एचआरसी १०९५/४१/पोल १४,दि.१७ जाने.१९९९ तसेच शासन परिपत्रक गृह विभाग क्रमांकः एचआरसी १०९७/१७४/पोल १४ ,दि.६ नोव्हेंबर १९९७ अन्वये सर्व संबंधित प्राधिका-यांना पोलीस तसेच न्यायालयीन कोठडीत मृत्यू पावलेले घटनेबाबतचे अहवाल (इंग्रजीमध्ये ) मृत्यूची घटना घडलेल्या क्षणापासून किंवा घटना कळल्यापासून २४ तासाच्या आत विहित विवरणपत्रात आयोगास पाठविण्याबाबत कळविणेत आले आहे, उपरोक्त आदेश आजही कायम असून त्वरीत संदर्भासाठी त्या परिपत्रकांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

## (२) आयोगाचे संदर्भावर त्वरीत कार्यवाहीकरणेबाबत

आयोगाकडून प्राप्त झालेल्या संदर्भावर आयोगास उत्तर पाठवितांना ते विभाग प्रमुखाच्या सहीने व ज्याला उद्येशुन पाठविलेले आहेत त्या अधिका-याच्या सहीने पाठवून त्याची प्रत कार्यासन पोल १४ गृह विभागाला अग्रेषित करणेबाबत तसेच अशी उत्तरे त्वरीत पाठविणेबाबत शासन परिपत्रक गृह विभाग क्रमांक :एचआरसी ०६९७/९०/१९९७/पोल १४,दि.१४ जुलै १९९७ व शासन परिपत्रक गृह विभाग क्रमांक :एचआरसी १३९९/९/पोल १४,दि.८ जून १९९९ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. उपरोक्त सूचना अद्याप कायम असून त्वरीत संदर्भासाठी त्या परिपत्रकाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

## (३) राज्य शासनाचे अधिकारी व भारतीय विदेश दूतावासाचे प्रतिनिधी यांच्यामधील मानवी हक्क प्रकरणासंदर्भातील अंमलात आणावयाच्या संदर्भ पध्दतीबाबत मार्गदर्शक तत्वेः-

विदेशी दूतावासाशी पत्रव्यवहार करताना भारत सरकारचे गृह मंत्रालय हे संपर्क मंत्रालय असल्याने मानवी हक्क संदर्भातचे प्रकरणावरील पत्रव्यवहार त्यांचेमार्फत करणेबाबत शासन परिपत्रक गृह विभाग क्रमांक :एचआरसी १३९८/४/पोल १४,दि.१ जून १९९८ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. त्या आजही कायम आहेत. त्वरीत संदर्भासाठी उपरोक्त परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

## (४) फौजदारी प्रक्रियासंहिता १९७३ च्या कलम १७६ मधील पोलीस कोठडीत / रखवालीत मृत्यू पावलेल्या व्यक्तिच्या मृत्यूच्या कारणाची चौकशी दंडाधिका-याने करणेबाबत.

1-1

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १७६ अन्वये पोलीस कोठडीत /रखवालीत मृत्यू पावलेल्या व्यक्तिच्या मृत्यूच्या कारणाची चौकशी दंडाधिकारी यांनी करणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. असे असताना देखील काही प्रकरणामध्ये दंडाधिकारीय चौकशी होत नसल्याने अशी दंडाधिकारीय चौकशी करणेबाबत व कलम १७६ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीची अंमलबजावणी करणेबाबत शासन परिपत्रक गृह विभाग क्रमांक :सीआयआय ०१८७/प्र.क्र.८१/पोल १४,दि.२ जून १९९८ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त सूचना अद्यापही कायम असून त्वरीत संदर्भासाठी उक्त परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

५) **पोलीस व कारागृह कोठडीतील आरोपी अथवा गुन्हेगार यांच्या मृत्यूप्रकरणी मृत व्यक्तीचे शवविच्छेदन करताना व्हीडीओ फिल्म घेणेबाबत.**

पोलीस कोठडीत वा न्यायालयीन कोठडीत मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे शवविच्छेदन करताना व्हीडीओ फिल्म घेण्याबाबत शासन परिपत्रक गृह विभाग क्रमांक :एचआरसी ७९९५/३४/पोल १४,दि.१८ जानेवारी १९९९ अन्वये आदेश पारीत करण्यात आले आहेत. उपरोक्त आदेश अद्यापही कायम असून त्वरीत संदर्भासाठी उक्त आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अ. ना. भोसले)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन,गृह विभाग.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त.
कारागृह महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व जिल्हादंडाधिकारी.
सर्व पोलीस अधिक्षक,
सर्व मंत्रालयीन विभाग.